आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० जुलै २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

जिल्हा परिषदेच्या शाळांमधल्या शिक्षकांची बदली प्रक्रिया शाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण व्हावी, याकरता नियमावली तयार करण्याचं सरकारचं विधानसभेत आश्वासन

मुंबई-पुणे दरम्यान बोरघाटात दरडी कोसळल्यामुळे मध्य रेल्वेच्या ३० गाड्या येत्या १७ तारखेपर्यंत रद्द

मुंबईला पाणीपुरवठा करणारे जलाशय ४९ टक्के भरले

ऑस्ट्रेलियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री न्यूझीलंडला पोहोचले

**आणि**

ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर आज महिला क्रिकेटचा पहिला कसोटी सामना भारत आणि इंग्लंड यांच्यात रंगणार

**<><><><><>**

राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधल्या शिक्षकांची बदली प्रक्रिया शाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण व्हावी, या दृष्टीने शासन नियमावली तयार करेल, असं आश्वासन मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिलं. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आता प्राथमिक स्तरावरच्या पेट स्कॅनचा समावेश देखील करण्यात येणार असून कर्करोगावर उपचार करण्यासाठी अधिकची रक्कम या योजनेमध्ये दिली जाईल अशी माहिती आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केली होती, त्यावर मनीषा चौधरी यांनी उपप्रश्न विचारला.

ग्रामीण भागात या योजनेचा फायदा मिळावा यासाठी रुग्णालयांच्या निकषांमध्ये बदल करण्यात येतील अशी माहिती देखील मंत्र्यांनी यांनी यावेळी दिली. राज्यातील ग्रामीण भागात दर पाच किलोमीटरच्या परिसरामध्ये आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत त्यानुसार या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एक बृहद आराखडा तयार करण्यात येत आहे असं आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिली.

**<><><><><>**

जल जीवन मिशनच्या अंतर्गत विविध कामांचे १८ हजार सुधारित प्रस्ताव सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यांना लवकरात लवकर मंजुरी देऊ आणि आवश्यक निधी देऊ असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधान परिषदेत सांगितलं. अनेक गावामध्ये पाहणी करताना काही वाड्या वस्त्या वगळल्यामुळे सुधारित प्रस्ताव मागवले होते. यापूर्वी ११ हजार प्रस्ताव मंजूर झाले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

गेल्या वर्षी ऑगस्ट ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातल्या चौदाशेहून अधिक पाझर तलाव आणि कोल्हापुरी बंधाऱ्यांचं नुकसान झालं. त्यातल्या ४५२ कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत दिली. ४५२ पैकी २५८ कामं पूर्ण झाली असून १०९ कामं सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

'गाव तिथे उद्योजक' ही योजना राज्य सरकार तयार करणार आहे अशी घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत केली. याशिवाय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याचा दौरा करून जनता दरबार पद्धतीने त्यांच्या अडचणी सोडवणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

<><><><><>

मुंबई-पुणे दरम्यान बोरघाटात दरडी कोसळल्यामुळे मध्य रेल्वेनं ३० गाड्या येत्या १७ तारखेपर्यंत रद्द केल्या आहेत. त्यात मुंबई आणि पुणे दरम्यान धावणाऱ्या डेक्कन क्वीन, डेक्कन एक्सप्रेस आणि इंटरसिटी एक्सप्रेस, तसंच सीएसएमटी-हैदराबाद एक्सप्रेस, चेन्नई एग्मोर सुपरफास्ट मेल, हुबळी-दादर एक्सप्रेस इत्यादी गाड्यांचा समावेश आहे.

६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे कर्जत आणि लोणावळा स्थानकांदरम्यान अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या. त्यामुळे तिन्ही रेल्वे मार्गांचं मोठं नुकसान झालं आहे. दुरुस्तीचं काम युद्धपातळीवर सुरू असलं तरी, कठीण भौगोलिक परिस्थिती आणि दुरुपस्ती कार्यातल्या धोकादायक स्थितीमुळे सेवा पूर्णपणे पूर्ववत व्हायला वेळ लागत असल्याचं रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

गेला आठवडाभर पडलेल्या जोरदार पावसामुळे, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांच्या जलसाठ्यात चांगली वाढ झाली आहे. सध्या एकूण उपलब्ध जलसाठा 7 लाख 3 हजार 260 दशलक्ष लिटर, म्हणजे या धरणांच्या एकूण क्षमतेच्या 48 पूर्णांक 59 शतांश टक्के

इतका आहे. गेल्या चोवीस तासांत सुमारे 1 लाख 4 हजार 671 दशलक्ष लिटर पाण्याची भर पडली आहे. विहार आणि तुळशी ही दोन्ही धरणं भरून वाहू लागली आहेत.

मोडक सागर सुमारे 82.7 टक्के आणि तानसा सुमारे 77.5 टक्के भरले नसल्याची माहिती मुंबई महापालिकेच्या जल अभियंता विभागाने केली आहे. सात धरणांची एकूण साठवण क्षमता सुमारे 14 लाख 47 हजार 363 दशलक्ष लिटर इतकी आहे. त्यामुळे तलावाच्या पाणलोट क्षेत्रात अजूनही पुरेशा पावसाची प्रतीक्षा आहे.

<><><><>

पालघर जिल्ह्यात वसई-विरार परिसरात निर्माण झालेली पूरपरिस्थिती ही केवळ मुसळधार पावसामुळे नाही तर अनियंत्रित शहरीकरण आणि नैसर्गिक नाल्यांवर झालेल्या अतिक्रमणामुळे झाल्याचं वनमंत्री आणि पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितलं. पूरनियंत्रणासाठी या परिसराचं उपग्रह आणि ड्रोनच्या मदतीनं सर्वेक्षण करुन १५ ते २० दिवसांत सर्वंकष कृती आराखडा तयार करणार असल्याची माहिती ही त्यांनी दिली.

नाईक यांनी काल नालासोपारा, नायगाव, ससून-नवघर आणि सफाळे या पूरग्रस्त भागांचा पहाणी दौरा करत तिथल्या नागरिकांशी संवाद साधला. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नागरिकांना लवकर आर्थिक मदत देण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. पूर ओसरल्यानंतर अवघ्या १२ तासांत महावितरणने दोन लाखांहून अधिक वीज ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत केल्याची माहिती प्रशासनाने दिली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासमवेत आज मेलबर्न क्रिकेट मैदानाला भेट दिली. भारतात तंत्रज्ञानाप्रमाणे खेळांचंही लोकशाहीकरण होत असल्याचं सांगून त्यांनी सांगितलं, "खेलो इंडिया'मुळे ग्रामीण भागातल्या सामान्य कुटुंबांतल्या मुलांना मोठी स्वप्न पाहण्याचं व्यासपीठ मिळालं आहे. २०३० मधे राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा भारतात होणार असून, २०३६ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचं यजमानपद मिळवण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असं ते म्हणाले. मोदी यांनी यावेळी ऑस्ट्रेलियातले तरुण खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधला. ऑस्ट्रेलियात आयोजित होणाऱ्या 'बिग बॅश लीग' क्रिकेट स्पर्धांचा एक हंगाम भारतात आयोजित केला जाईल, अशी घोषणा ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अल्बानीज यांनी यावेळी केली.

ऑस्ट्रेलियातले विरोधी पक्ष नेते अंगस टेलर यांचीही भेट प्रधानमंत्री मोदी यांनी आज घेतली. संरक्षण, व्यापार, शिक्षण गुंतवणूक, हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातलं नौवहन अशा विविध विषयांवर त्यांची चर्चा झाली. ऑस्ट्रेलियाबरोबरचे संबंध भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असल्याचं मोदी म्हणाले.

**- - - होल्ड - बाईट- प्रधानमंत्री २ - - -**

तीन दिवसांच्या दौऱ्यात महत्त्वपूर्ण चर्चा आणि भेटीगाठी आटोपून प्रधानमंत्री मोदी न्यूझीलंडसाठी रवाना झाले. ऑकलंड इथं न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी मोदी यांचं स्वागत केलं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यानच्या क्रीडा संबंधांना यावर्षी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दौरा होत आहे. भारतीय सेनादलांच्या हॉकी संघाने १९२६ मध्ये प्रथम न्यूझीलंडचा दौरा केला होता. या संघात भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचाही समावेश होता. याच दौऱ्यापासून मेजर ध्यानचंद यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील कारकिर्दीला सुरुवात झाली.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंडदरम्यानच्या कसोटी सामन्याला आजपासून लॉर्ड्स मैदानावर सुरुवात होत आहे. दुपारी साडे तीन वाजता सामन्याला सुरुवात होईल. ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर प्रथमच महिलांचा क्रिकेट सामना होत आहे.

इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

जास्त प्रमाणात इथाईल अल्कोहोल असलेल्या औषधांवरचं नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी केंद्र सरकारनं, औषध कायदा १९४५ मध्ये सुधारणा केली आहे. अशा औषधांना शेड्युल के अंतर्गत देण्यात आलेली परवाना अनिवार्यता सूट आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं रद्द केली आहे. त्यामुळे १२ टक्क्यांहून अधिक इथाईल अल्कोहोल असलेली आणि ३० मिलिलिटरपेक्षा जास्त प्रमाणातल्या औषध यापुढे परवाना आवश्यक असणार आहे. मंत्रालयानं यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक पद्धतीला गोवा राज्य सरकारने पाठिंबा दिला आहे. एक देश एक निवडणूक पद्धतीवर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समिती सध्या गोव्याच्या दौऱ्यावर आहे. या निर्णयामुळे सरकारला विकासावर अधिक लक्ष देता येईल आणि उत्तम प्रशासन सुनिश्चित करणं शक्य होईल, असं मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले.

<><><><><>

देशात विजेच्या एकूण मागणीपैकी ५० टक्क्यांहून अधिक मागणी स्वच्छ ऊर्जेद्वारे पूर्ण झाली असून हे दुसऱ्यांदा घडत असल्याचं उर्जा आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितलं. ६ जुलै रोजी एकूण वीज पुरवठ्यामध्ये नवीकरणीय स्त्रोतांचा वाटा ५० पूर्णांक २ दशांश टक्के इतका होता, असं जोशी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

अमरनाथ यात्रेसाठी ८ हजार ७९६ भाविकांची नववी तुकडी आज भगवती नगर बेस कॅम्पवरून कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत रवाना झाली. आज पहाटे ३ हजार ४५० भाविकांना घेऊन जाणारा एक जथा बालताल मार्गे तर उर्वरित ५ हजार ३४६ भाविकांचा जथा पहलगाम मार्गे रवाना झाला.

//<><><><><>//